आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२६ मार्च २०२४ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातल्या १०२ जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करायचा उद्या शेवटचा दिवस

- लोकसभा निवडणुकीसाठी सुधीर मुनगंटीवार, अशोक ने◌ेते आणि विकास ठाकरे यांचे अर्ज दाखल

- मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाकडून अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातली पोटनिवडणूक रद्द

**आणि**

- अमेरिकेत बाल्टिमोरमध्ये मालवाहू जहाजाच्या धडकेत पूल कोसळला

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करायचा उद्या शेवटचा दिवस आहे. मात्र बिहारमधे ही मुदत येत्या गुरुवारपर्यंत आहे.

पहिल्या टप्प्यात तामिळनाडूतल्या ३९, राजस्थान-१२, उत्तप्रदेश-८, मध्यप्रदेश-६, महाराष्ट्र, उत्तराखंड आणि आसाममधे प्रत्येकी ५, बिहारमधे ४, पश्चिम बंगालमधे ३, अरुणाचल प्रदेश, मणीपूर आणि मेघालयमधे प्रत्येकी २, तर छत्तीसगढ, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा, अंदमान-निकोबार, जम्मू-कश्मीर, लक्षद्वीप, आणि पुदुच्चेरी इथल्या प्रत्येकी १ अशा १०२ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होत आहे.

अर्जांची छाननी येत्या २८ तारखेला होणार आहे. येत्या ३० मार्चपर्यंत उमेदवारी अर्ज मागं घेता येतील. बिहारमधे छाननी ३० मार्चला होणार असून, उमेदवारी अर्ज मागं घेण्याची मुदत २ एप्रिलपर्यंत आहे. या टप्प्यासाठी १९ एप्रिलला मतदान होईल.

दुसऱ्या टप्प्यात विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या एकदंर ८९ मतदारसंघांमधल्या निवडणुकीची अधिसूचना येत्या गुरुवारी जारी होणार आहे.

**<><><><><><>**

पहिल्या टप्प्यात राज्यातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया, आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांचा समावेश असून, इथल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा भारतीय जनता पक्ष आणि काँग्रेसनं केली आहे. या जागांसाठी १९ एप्रिलला मतदान होणार आहे

नागपुरातून काँग्रेस उमेदवार विकास ठाकरे यांनीही आज अर्ज भरला.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी भाजपाचे उमेदवार म्हणून आज अर्ज दाखल केला.

गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात भाजपाचे अशोक महादेवराव नेते यांनीही आज उमेदवारी अर्ज दाखल केला. बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षातर्फे बारीकराव धर्माजी मडावी यांनीही अर्ज दाखल केला. या मतदारसंघातून आतापर्यंत ४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

**<><><><><><>**

महायुतीचं ९९ टक्के जागावाटप निश्चित झालं असून गुरुवारी जागावाटप आणि उमेदवार यादी जाहीर होईल. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषद घेणार असल्याची माहिती

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. रायगडमधून प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हेच महायुतीचे उमेदवार असतील अशी घोषणाही त्यांनी केली.

शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी संध्याकाळी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. ते पक्षाचे शिरूरमधले उमेदवार असतील.

**<><><><><><>**

महाविकास आघाडीच्या जागा वाटपात दोन जागांवर अजून निर्णय झालेला नाही, त्यावर चर्चेतून लवकरच मार्ग निघेल, असं काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज सांगितलं.

वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या प्रस्तावासाठी काँग्रेसने एक पाऊल पुढे टाकले आहे. आता शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी तो प्रस्ताव मान्य करावा असं आवाहन पटोले यांनी केलं.

वंचित बहुजन आघाडीसोबत चर्चा अजूनही सुरू आहे, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, प्रकाश आंबेडकर यांनी चांगला प्रस्ताव दिला तर त्याचा विचार करु असा दावा एकनाथ शिंदेंसोबत असलेले आमदार संजय शिरसाठ यांनी केला आहे.

**<><><><><><>**

वंचित बहुजन आघाडीचा लोकसभा निवडणुकीच्या संदर्भातला निर्णय आज संध्याकाळी राज्य कार्यकारणीच्या बैठकीत ठरणार आहे. वंचित बहुजन आघाडीचे मुख्य प्रवक्ते सिद्धार्थ मोकळे यांनी समाजमाध्यमांवर ही माहिती दिली आहे. आजच्या बैठकीत होणारा निर्णय पक्षाचे अध्यक्ष ॲड प्रकाश आंबेडकर उद्या अकोल्यातून जाहीर करतील, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><><>**

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातली पोटनिवडणूक मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर पीठानं आज रद्द केली. भाजपा आमदार गोवर्धन शर्मा यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या या जागेसाठी १६ मार्चला पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली. त्याविरोधात अनिल दुबे यांनी जनहित याचिका दाखल केला होती. या पोटनिवडणुकीत निवडून येणाऱ्या उमेदवाराला पुरेसा कालावधी मिळत नसल्याचा मुद्दा त्यांनी मांडला. नवीन सदस्याला निवडून आल्यावर फक्त चार महिन्याचा कालावधी मिळणार होता. नियमानं तो कमीतकमी सहा महिने मिळायला हवा. हे मान्य करत न्यायालयानं ही पोटनिवडणूक रद्द केली.

**<><><><><>**

भाजपाच्या बसीरहाट इथल्या उमेदवार रेखा पात्रा यांच्याशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज दूरध्वनीवरून संवाद साधला आणि त्यांना शक्तीस्वरूपा असे संबोधले. तिथल्या लोकसभा निवडणुकीच्या तयारी विषयी मोदी यांनी चौकशी केली.

**<><><><><>**

विविध राज्यांमधून येणाऱ्या एकाच स्वरूपाच्या तक्रारींबद्दल निवडणूक अधिकारी वेगवेगळ्या पद्धतीनं प्रतिसाद देत असल्याच्या मुद्द्यावरुन आज भाजपानं निवडणूक आयोगाकडे धाव घेतली. अश्विनी वैष्णव आणि विनोद तावडे या नेत्यांसह आज भाजपा शिष्टमंडळानं नवी दिल्लीत आयोगाची भेट घेतली आणि हा मुद्दा मांडला. कथित आक्षेपार्ह वक्तव्यांबद्दल भाजपाच्या नेत्या आणि केंद्रीय मंत्री शोभा कारंदलाजे यांच्यावर कारवाई झाली मात्र त्याचं प्रकारचं वक्तव्य तमिळनाडूच्या मंत्र्यानं केलं असताना त्याच्यावर काहीच कारवाई झाली नाही, हे उदाहरण यावेळी भाजपा नेत्यांनी दिलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याविषयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी काढलेल्या अवमानजनक

वक्तव्याचा मुद्दाही आयोगाच्या निदर्शनाला आणून दिल्याचं तावडे यांनी बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. निवडणूक प्रक्रियेला वेग आला असताना अशा प्रकारच्या वक्तव्यांवर निवडणूक आयोगानं नियंत्रण ठेवावं, अशी विनंती भाजपानं केल्याचं तावडे म्हणाले.

**<><><><><><>**

मार्च ते जून या कालावधीत देशात उष्णतेची लाट येण्याची शक्यता लक्षात घेऊन याचा मुकाबला करण्यासाठी निवडणूक आयोगानं राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणानं काय करावं आणि काय करू नये याविषयीची जारी केलेली यादीच या अधिकाऱ्यांना पाठवली आहे. दुपारी १२ ते दुपारी ३ या वेळेत घराबाहेर जाऊ नये, पुरेसं पाणी प्यावं, शिळं अन्न खाऊ नये असा सल्ला या यादीत दिला आहे.  मतदान केंद्रांवर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि शेड अशा सुविधा असाव्यात अशी सूचनाही दिली आहे. येत्या उन्हाळ्यात देशातलं तापमान सरासरीपेक्षा अधिक असण्याची शक्यता असून तीव्र उष्मा अधिक कालावधीसाठी राहील असा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><><>**

केंद्रीय मंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते किरण रिजिजू यांनी अरूणाचल पश्चिम या लोकसभा मतदारसंघातून आज उमेदवारी अर्ज दाखल केला. तर काँग्रेसतर्फे माजी मुख्यमंत्री नबाम तुकी यांनी उमेदवारी अर्ज भरला.

नागालँडच्या एकमेव लोकसभा मतदारसंघासाठी नागालँडच्या पीपल्स डेमोक्रेटिक अलायन्सच्या डॉ. चुंबेन मुरी यांनी उमेदवारी अर्ज भरला आहे. तर काँग्रेसच्या वतीनं एस. सुपोंगमेरेन जमीर यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला.

पुदुच्चेरी लोकसभा मतदारसंघातून सात उमेदवारांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला असून डी. अलंगारवेलू यांनी बहुजन समाज पक्षाकडून उमेदवारी अर्ज दाखल केला.

<><><><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने आणखी ३ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. राजस्थानातल्या दौसामधे कन्हैयालाल मीणा आणि करौली – धोलपूर मधे इंदु देवी जाटव यांना तिकिट मिळालं आहे. मणिपूरमधे अंतर्मणिपूर मतदारसंघात थौनोजाम बसंता कुमार सिंग यांना उमेदवारी मिळाली आहे.

दरम्यान, काँग्रेसचे खासदार रवनीत सिंग बिट्टू यांनी आज भाजपात प्रवेश केला. नवी दिल्लीतल्या पक्ष मुख्यालयात भाजपाचे महासचिव विनोद तावडे यांनी बिट्टू यांचं पक्षात स्वागत केलं.

<><><><><><>

हिमाचल प्रदेश विधानसभेच्या ६ जागांवरच्या पोटनिवडणुकीसाठीही भाजपाने उमेदवार जाहीर केले आहेत. काँग्रेसच्या ६ आमदारांनी नुकताच भाजपात प्रवेश केला. त्या रिक्त जागांवर ते आता भाजपाच्या तिकिटावर निवडणूक लढवतील.

<><><><><><>

अमेरिकेतल्या बाल्टिमोर इथं एका मालवाहू  जहाजानं धडक दिल्यानं आज फ्रान्सिस स्कॉट पुलाचा मोठा भाग कोसळला. यामुळे  अनेक वाहनं आणि वीसपेक्षा जास्त माणसं नदीत पडल्याची शक्यता आहे. अतिशीत हवामान आणि धुक्यामुळे

कमी झालेली दृश्यमानता यामुळे बचावकार्यात अडचणी येत आहेत. पुलाला धडक बसल्यानंतर जहाजाला आग लागून ते बुडालं.

**<><><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत, आज चेन्नईतल्या एम ए चिंदबरम स्टेडिअमवर, चेन्नई सुपर किंग्ज आणि गुजरात टायटन्स यांच्यात सामना सुरु आहे. गुजरात टायटन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा चेन्नई सुपर किंग्जच्या ८ षटकात १ बाद ८४ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><><>//**